<u>कोविड-१९च्या प्रादुर्भावामुळे अर्थव्यवस्थेवर</u>
<u>होणाऱ्या परिणामावरील उपाययोजना-</u>
<u>तज्ञ समिती गठीत करण्याबाबत.</u>

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग,
शासन निर्णय क्रमांक :- संकीर्ण २०२० /प्र.क्र.१९ (२)/साधनसंपती
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
दिनांक :- १३ एप्रिल, २०२०.

<u>प्रस्तावना -</u>

मार्च २०२० पासून महाराष्ट्रात कोविड-१९या संसर्गजन्य रोगाचा प्रादुर्भाव झाला असून या रोगाने बाधित रुग्णांच्या संख्येत सातत्याने मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. यामुळे प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून संपूर्ण देशात दि.२४ मार्च २०२० पासून लॉकडाऊन लागू करण्यात आला आहे. लॉकडाऊनव्दारे अनेक निर्बध घालण्यात आले आहेत. सदर निर्बधांमुळे राज्यातील सर्व उद्योग, व्यापार, सेवाक्षेत्र बंद पडलेले आहेत. परिणामी राज्याची अर्थव्यवस्था ठप्प झाली आहे. साहजिकच त्याचा विपरीत परिणाम राज्याच्या कर व करेतर महसूल संकलनावर झाला व होत आहे. सदर संसर्गाचा प्रादुर्भाव अदयापही वाढत असल्याने व त्यामुळे लागु केलेल्या लॉकडाऊनच्या अनुषंगाने राज्याची आर्थिक स्थिती पुढील काही महिन्यातही अशीच राहण्याची शक्यता आहे. या स्थितीतून बाहेर पडून राज्याच्या अर्थव्यवस्थेला उभारी आणण्याचे राज्यासमोर मोठे आव्हान आहे. यानुषंगाने अर्थव्यवस्थेचे पुनरुज्जीवन करण्यासंदर्भात प्रभावी उपाययोजना करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय-

कोरोना प्रादुर्भावाच्या अनुषंगाने केलेल्या लॉकडाऊनमुळे राज्याच्या अर्थव्यवस्थेवर झालेल्या परिणामांचा सखोल अभ्यास करुन उपाययोजना सुचविण्यासाठी दिनांक ०९ एप्रिल २०२० रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत तज्ञ समिती गठीत करण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे.

१. श्री. जे. एस. सहानी, सेवानिवृत्त भाप्रसे,
२. श्री. सुबोध कुमार, सेवानिवृत्त भाप्रसे,
३. श्री.रमानाथ झा, सेवानिवृत्त भाप्रसे,
४. श्री.उमेशचंद्र सरंगी, सेवानिवृत्त भाप्रसे,
५. श्री.जयंत कावळे, सेवानिवृत्त भाप्रसे,
६. श्री.सुधीर श्रीवास्तव, सेवानिवृत्त भाप्रसे,
७. अपर मुख्य सचिव (नियोजन) नियोजन विभाग, मंत्रालय,
८. अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग - समन्वयक,
९. प्रधान सचिव (उद्योग), उद्योग, उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय,
१०. प्रधान सचिव (वित्तीय सुधारणा), वित्त विभाग, मंत्रालय,
११. सचिव (कृषि), कृषि व पदुम व दुग्धव्यवसाय विभाग, मंत्रालय

२. सदर समिती ही राज्यात कोरोना प्रादुर्भावाच्या अनुषंगाने केलेल्या लॉकडाऊनमुळे राज्याच्या अर्थव्यवस्थेवर झालेल्या परिणामांचा सखोल अभ्यास करुन राज्याची अर्थव्यवस्था पूर्वपदावर आणण्यासाठी उपाययोजना सुचविल.

३. समिती दिनांक ३० एप्रिल, २०२० पर्यंत त्यांचा अहवाल शासनास सादर करेल.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२००४१७१२२६३८३९०५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Jayant Balkrishna Kulkarni

Digitally signed by Jayant Balkrishna Kulkarni
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Finance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=21c6e2b773a3859ca97c27d5f4e1521c3f812fcd1a7cbeac6f9da1018849c0a7, serialNumber=9def0b6a8723e2ed0b4674c8e4a796ef130132f3686de1ae9848aad4de2445e0, cn=Jayant Balkrishna Kulkarni
Date: 2020.04.17 17:20:58 +05'30'

(ज.बा. कुलकर्णी)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. राज्यपालांचे सचिव,
२. मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
३. मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
४. मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/ विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
५. सर्व सन्माननीय संसद, विधानसभा व विधानपरिषद सदस्य,
६. मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
७. मा. उपमुख्यमंत्र्यांचे सचिव,
८. सर्व मा. मंत्री/मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
९. मा. मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
१०. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर,
११. महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर,
१२. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
१३. श्री. जे. एस. सहानी, सेवानिवृत्त भाप्रसे,
१४. श्री. सुबोध कुमार, सेवानिवृत्त भाप्रसे,
१५. श्री.रमानाथ झा, सेवानिवृत्त भाप्रसे,
१६. श्री.उमेशचंद्र सरंगी, सेवानिवृत्त भाप्रसे,
१७. श्री.जयंत कावळे, सेवानिवृत्त भाप्रसे,
१८. श्री.सुधीर श्रीवास्तव, सेवानिवृत्त भाप्रसे,
१९. मंत्रालयीन सर्व विभागांच्या अधिनस्त असलेल्या सर्व विभागांचे व कार्यालयांचे प्रमुख,
२०. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानसभा/ विधानपरिषद), मुंबई,
२१. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई,
२२. भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी.ओ.बॅरेक्स क्र.१, योगक्षेमसमोर, वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईन्ट, मुंबई-२०,

२३. इंडियन नॅशनल काँग्रेस, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस (आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई- २५,
२४. नॅशनॅलिस्ट काँग्रेस पार्टी, ठाकरसी हाऊस, जे.एन. हेराडीया मार्ग, बलार्ड इस्टेट, मुंबई ४०० ००१,
२५. शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई-४०० ०२८,
२६. बहुजन समाज पार्टी, प्रदेश सचिव, महाराष्ट्र राज्य, बी.एस.जी.भवन, प्लॉट नं. ८३-अे, कलेक्टर कॉलनी, चेंबूर, मुंबई-१४,
२७. भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी, ३१४, राज भुवन, एस.व्ही.पटेल रोड, मुंबई-४०० ००४,
२८. भारतीय कम्युनिस्ट पार्टी, (मार्क्सवादी) महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅसेज, लोअर परळ, मुंबई-४०००१३,
२९. महाराष्ट्र नवनिर्माण सेना, राजगड, मातोश्री टॉवर, शिवाजी पार्क, दादर, मुंबई ४०० ०२८,
३०. ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन ,मुंबई,
३१. वित्त विभागातील सर्व कार्यासने/निवड नस्ती, वित्त विभाग (साधनसंपती).